SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103

Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ :– शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/चव्हाण/ 63 दि. 24.09.2019

प्रति,
प्राचार्य /अधिविभाग प्रमुख
सर्व संलग्नीत महाविद्यालये/
सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय :– ऑक्टो./नोंव्हे., 2019 या सत्रातील परीक्षेसाठी करावयाच्या अंतर्गत व बहिःस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक नेमणुकीबाबत...

संदर्भ :– जा.क्र.शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/358, दि. 01 ऑगस्ट, 2019 रोजीचे परीक्षा प्रारंभ तारखांबाबतचे परिपत्रक

महोदय/महोदया,

आपणास विदित आहेच की हिवाळी सत्रातील विद्यापीठाच्या परीक्षा 15 ऑक्टोंबर, 2019 पासून सुरु होत आहेत. सदर परिक्षेकरिता बहिःस्थ व अंतर्गत वरिष्ठ पर्यवेक्षक नियुक्तीची प्रक्रिया सत्वर सुरू करणे आवश्यक आहे या संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

1 गट व गट प्रमुख महाविद्यालयाची/अधिविभागांची यादी सोबत जोडली आहे. गटप्रमूख प्राचार्यांनी/विभागप्रमुखांनी आपल्या स्तरावर आपल्या गटामधील महाविद्यालयांच्या प्राचार्यांची/अधिविभागातील विभागप्रमुखांची बैठक आयोजित करून बैठकीमध्ये विद्यापीठाने जाहीर केलेल्या परीक्षेच्या सत्रासाठी (sessionwise) अंतगर्त व बहिःस्थ वरिष्ठ पर्यवेक्षकांची नावे निश्चित करावीत. गट प्रमुखांनी सदरची नावे परीक्षक नियुक्ती विभागास सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे कळविण्यात यावीत. (सर्व सत्रासाठी नावे एकाचवेळी देण्यात यावीत.) तसेच ज्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्यात येतात त्या परीक्षेस बहिःस्थ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात येवू नये.

2 गटामधील परीक्षा केंद्रासाठी बहिःस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करत असताना A महाविद्यालयाचे, B महाविद्यालयास, B महाविद्यालयाचे C महाविद्यालयास व C महाविद्यालयाचे A महाविद्यालयास अशा प्रकारे बहिःस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक याच्यां नेमणूकीसाठी नावे देण्यात यावीत.

3 सदर बैठकीसाठी येणारा दैनंदिन/प्रवास भत्ता व चहापाण्याचा खर्च विद्यापीठाकडून परीक्षेसाठी देण्यात आलेल्या तसलमात रक्कमेतून करण्यात यावा व तो खर्च तसलमात रक्कमेच्या उपयोगिता प्रमाणपत्रामध्ये समाविष्ठ करण्यात यावा.

4 विद्यापीठाकडून संबधित वरिष्ठ पर्यवेक्षकांना नियुक्ती आदेश पाठविण्यात येतील व त्या त्या परीक्षा केंद्रास त्याची प्रत देण्यात येईल. **वरिष्ठ पर्यवेक्षकांना नियुक्तीचे आदेश दिल्यानंतर रद्द अथवा परस्पर बदल करता येणार नाही व आदेशानुसार त्या त्या महाविद्यालयात हजर रहावे लागेल. जे शिक्षक संबंधित परीक्षा केंद्रावर हजर रहाणार नाहीत त्यांची नांवे परीक्षा प्रमाद समितीस कळविण्यात येतील.**

5 Cluster प्रमुखांनी कामाचे नियोजन परस्पर सांमजस्याने व सहकार्याने करणे आवश्यक आहे शक्यतो शिक्षकांची गैरसोय होवू नये असे पहावे.

6 गटप्रमुंखाची यादी, परीक्षा सत्रांचा वरीष्ठ पर्यवेक्षक माहितीचा नमुना तक्ता विद्यापीठाच्या संकेतस्थाळावर www.unishivaji.ac.in ⟹ Circular ⟹ Examination या ठिकाणी उपलब्ध आहे.

दि. 15 ऑक्टो. 2019 पासून विद्यापीठाच्या अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयामध्ये विविध अभ्यासकमाच्या परीक्षा सुरू होत असल्याने गटप्रमुखांनी सोबत जोडलेल्या यादीनुसार आपल्या गटांमधील अधिविभाग प्रमुख/प्राचार्यांची बैठक त्वरित घेऊन निश्चित केलेली अंतर्गत व बहिःस्थ वरिष्ठ पर्यवेक्षकांची नावे pdf करून appointment.a@unishivaji.ac.in या E-mail ID वर दि. 01/10/2019 पूर्वी पाठवून त्याची एक प्रत, उपकुलसचिव, प्री–एक्झाम, परीक्षा भवन 1, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावेही पाठविण्यात यावी ही विंनती.

कळावे,

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ